# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - संगीत
- कवी / कवयित्रीचे नाव :- अनिल केळकर

---

संगीताच्या धारा करता स्पर्श कानाला
अतिशय हर्ष कसा होतो हो मनाला
बोटे धरू लागतात आपोआप ठेका
सारे चित्त गुंगून जाते क्षणात एका

चालू होता टीप टीप पावसाच्या थेंबांची
ऐकता किलबिल चिवचिवणाऱ्या पक्षांची
पहाटे एखाद्या देवळातील घंटेचा आवाज
अथवा चांदण्या रात्री समुद्राची गाज
कुठेही कसाही जाणवतो संगीताचा साज

कधी झंकारते सातरींच्या तारामधून
कधी गुंजून उठे सनईच्या सुरातून
कधी छेडते व्हायोलीनची करुण वेदना
कधी भात्याच्या पेटीतून रसरचना

कधी मंजुळ स्वर उमटती बासरीतून
तर कधी एखाद्या कमावलेल्या गळ्यातून
सप्त सुर उमटती भाता पेटीतून
ठेका साथीला तबला डगग्यातून
जेंव्हा वाद्याला स्वरांची जमते जोडी
अधिकच जाणवते मग संगीताची गोडी

हजारो वर्षे करत त्याची साधना आणि भक्ती
वाहलेल्या कलाकारांनी वाढवली त्याची श्रीमंती
देशादेशातील त्याच्या पेशीचा अनोखी बांधणी
कधी शास्त्रोक्त रागदरी, कधी पाश्च्यात्य सिंफनी

Arihant Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

आहेच मुळी प्रभावशाली संगीताची किमया
मानवाच्या मनावर भुरळ घालते लिलया
ते ऐकून गायी पण जास्त दुध देतात
आणि झाडे पण श्रवणाने जास्त वाढतात

टाळ, मृदंग, झांझानी होते आरती
शेहनाई चौघडा वाजवत लग्ने लागती
बाळाला झोपवताना हवीच अंगाई
रात्र रात्र होतात आपल्या मैफिली
नाटकामध्ये पदाला मिळते टाळी

जसे संगीत लागते कानात झिरपू
मनाचे भानच जणू लागते हरपू
विचार करा संगिता शिवाय कसे चालेल ?
जीवन रुक्ष रखरखीत वाळवंट वाटेल
आपल्या अंतर्नादातच आहे संगीत
संगीत आहे आपल्या जीवनाचा मीत

Anahat Music Therapy